RNI No. MAHBIL /2009/35530

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक २] मंगळवार, जानेवारी १६, २०१८/पौष २६, शके १९३९ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.—** गंभीर अपराधांशी संबंधित फौजदारी न्यायचौकशीतील साक्षीदारांना, त्यांच्या नातेवाईकांना संरक्षण देण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. . . . . . . . . . . | पृष्ठे १-५ |

दिनांक १५ जानेवारी २०१८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **" महाराष्ट्र शासन राजपत्रात "** दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**गंभीर अपराधांशी संबंधित फौजदारी न्यायचौकशीतील साक्षीदारांना, त्यांच्या नातेवाईकांना संरक्षण देण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** गंभीर अपराधांशी संबंधित फौजदारी न्यायचौकशीतील साक्षीदारांना, त्यांच्या नातेवाईकांना संरक्षण देण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत अधिनियम, २०१७, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " समिती " किंवा " जिल्हा समिती " याचा अर्थ, जिल्हा साक्षीदार संरक्षण समिती असा आहे व त्यामध्ये कलम ३ अन्वये घटीत करण्यात आलेल्या महानगर क्षेत्र साक्षीदार संरक्षण समिती, आयुक्तालय क्षेत्र (महानगर क्षेत्राव्यतिरिक्त) साक्षीदार संरक्षण समिती, यांचा समावेश होतो ;

(ख) " फौजदारी न्यायचौकशी " याचा अर्थ, गंभीर अपराधाबद्दलची न्यायचौकशी, असा आहे;

(ग) " गंभीर अपराध " याचा अर्थ, जे अपराध मृत्युदंडाच्या किंवा आजीवन कारावासाच्या किंवा सात वर्षांहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरतात, असे अपराध, असा आहे;

(घ) " राज्य समिती " याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेली राज्य साक्षीदार संरक्षण समिती, असा आहे;

(ङ) " साक्षीदार " यात, गंभीर अपराधाबद्दलच्या न्यायचौकशीमध्ये जीवाला धोका असलेली पिडित व्यक्ती व तिचे जवळचे नातेवाईक, यांचा समावेश होतो.

समिती घटित करणे.

**३.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, राज्य शासनास, आदेशाद्वारे, पुढील समित्या घटित करता येतील :–

(क) राज्य साक्षीदार संरक्षण समिती;

(ख) प्रत्येक जिल्ह्याकरिता जिल्हा साक्षीदार संरक्षण समिती.

(२) आयुक्त, गुप्तवार्ता हा, राज्य समितीचा अध्यक्ष असेल आणि त्यात, विहित करण्यात येतील अशा इतर अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

(३) जिल्हा समितीमध्ये,–

(क) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम २ च्या खंड (ट) च्या अर्थांतर्गत, महानगर क्षेत्राच्या बाबतीत, पोलीस आयुक्त हा अध्यक्ष असेल, आणि त्यात विहित करण्यात येतील अशा इतर दोन अधिकाऱ्यांचा समावेश असेल; १९७४ चा २.

(ख) आयुक्तालय क्षेत्राच्या बाबतीत (महानगर क्षेत्राव्यतिरिक्त), पोलीस आयुक्त हा अध्यक्ष असेल, आणि त्यात विहित करण्यात येतील अशा इतर दोन अधिकाऱ्यांचा समावेश असेल;

(ग) खंड (क) किंवा (ख) मध्ये समाविष्ट नसलेल्या क्षेत्राच्या बाबतीत, जिल्हा दंडाधिकारी हा अध्यक्ष असेल, आणि त्यात विहित करण्यात येतील अशा इतर दोन अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

राज्य समितीचे अधिकार व कार्ये.

**४.** राज्य समिती पुढील अधिकारांचा वापर करील व पुढील कार्ये पार पाडील :–

(क) अधिनियमान्वये साक्षीदारांना दिलेल्या संरक्षणाचे संनियंत्रण करणे;

(ख) साक्षीदारांच्या संरक्षणाकरिता जिल्हा समित्या व पोलीस ठाण्यांना आवश्यक ते निदेश देणे;

(ग) विहित करण्यात येतील असे इतर कोणतेही अधिकार व कार्ये.

जिल्हा समित्यांचे अधिकार व कार्ये.

**५.** जिल्हा समिती, पुढील अधिकारांचा वापर करील व पुढील कार्ये पार पाडील :–

(क) समितीच्या अधिकारक्षेत्रातील साक्षीदारांना दिलेल्या संरक्षणाचे संनियंत्रण करणे;

(ख) कोणाला संरक्षण द्यावयाचे याचा निर्णय घेणे आणि अशा संरक्षणाची व्याप्ती व स्वरूप ठरविणे ;

(ग) साक्षीदारांच्या संरक्षणासाठी प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही करणे;

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

(घ) साक्षीदारांच्या संरक्षणासाठी संबंधित पोलीस ठाण्याला आवश्यक ते निदेश देणे;

(ङ) राज्य समितीकडून प्राप्त झालेल्या आदेशांवर आवश्यक उपाययोजना करणे;

(च) संरक्षण काढून घेण्याचा निर्णय घेणे;

(छ) साक्षीदारांच्या संरक्षणाबाबतीत शासनाला व राज्य समितीला आवश्यक ती माहिती पुरविणे;

(ज) ज्यांना संरक्षण देण्यात आलेले आहे किंवा ज्यांचे संरक्षण काढून घेण्यात आलेले आहे अशा साक्षीदारांचा अभिलेख ठेवणे;

(झ) विहित करण्यात येतील असे इतर कोणतेही अधिकार व कार्ये पार पाडणे.

**६.** गंभीर अपराधांमध्ये जर,— साक्षीदारांना संरक्षण.

(क) साक्षीदारांनी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी अर्ज केलेला असेल;

(ख) न्याय चौकशीमधील सरकारी अभियोक्त्याने किंवा अतिरिक्त सरकारी अभियोक्त्याने अर्ज केलेला असेल ;

(ग) गुन्हा अन्वेषण अधिकाऱ्याची किंवा अन्वेषणाशी संबंधित कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याची संरक्षण पुरविणे आवश्यक असल्याबाबत खात्री पटली असेल ;

(घ) राज्य समितीने असे निदेश दिलेले असतील ;

(ङ) राज्य शासनाने असे निदेश दिलेले असतील ;

(च) न्यायालयाने असे निदेश दिलेले असतील,

तर त्या साक्षीदारांना समितीकडून संरक्षण पुरविण्यात येईल.

**७.** (१) (क) जर फौजदारी न्यायचौकशीतील साक्षीदारांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली असेल तर, त्यांना ज्या स्वरूपात जीवे मारण्याची धमकी देण्यात आली असेल त्या धमकीचे स्वरूप व धमकी कोणाकडून देण्यात आली ती माहिती नमूद करून, संरक्षणासाठी संबंधित जिल्हा समितीकडे अर्ज करता येईल. साक्षीदारांना संरक्षण पुरविण्यासाठीची कार्यपद्धती.

(ख) या अधिनियमान्वये जर कोणत्याही साक्षीदाराने कोणत्याही पोलीस ठाण्यामध्ये कोणतीही तक्रार केलेली असेल तर, त्या प्रकरणात, पोलीस अधिकारी ती तक्रार, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी तात्काळ संबंधित जिल्हा समितीकडे पाठवील.

(२) जर साक्षीदार अज्ञान असेल तर, त्या प्रकरणात, त्या अज्ञान साक्षीदाराच्या संरक्षणासाठी त्याच्या माता-वा-पित्यास किंवा पालकास संबंधित जिल्हा समितीकडे अर्ज करता येईल.

(३) समिती, अर्ज प्राप्त झाल्यावर किंवा स्वाधिकारे, कोणताही विलंब न करता साक्षीदारांना संरक्षण देण्यासाठी, आवश्यक ती कार्यवाही करील. समितीस, सहायक पोलीस आयुक्त किंवा, यथास्थिति, जिल्हा पोलीस उप अधीक्षक याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणाऱ्या अधिकाऱ्याकडून धमकीच्या गांभीर्यासंबंधीचा अहवाल तात्काळ मागविता येईल.

(४) समितीस, धमकीच्या गांभीर्याच्या तिव्रतेनुसार अहवाल प्राप्त होईपर्यंत, फौजदारी न्यायचौकशीतील साक्षीदारांना अंतरिम स्वरूपात संरक्षण देण्याचा निर्णय घेता येईल.

(५) अहवाल प्राप्त झाल्यानंतर, समिती, धमकीच्या गांभीर्याविषयी सखोल चौकशी करील आणि सदर समितीस, जिचा जीव धोक्यात आहे अशा व्यक्तीला, जर संरक्षण दिलेले नसेल तर, संरक्षण देण्याचा निदेश सहायक पोलीस आयुक्ताला किंवा, यथास्थिति, पोलीस उप अधीक्षकाला देता येईल.

(६) समितीस, अल्प कालावधीसाठी साक्षीदारांना संरक्षण देता येईल आणि जर धमकीचे गांभिर्य कायम राहीले असेल तर, समितीस, तिला योग्य वाटेल तो पर्यंत, वेळोवेळी, हा कालावधी वाढवून देता येईल.

(७) संरक्षण देण्यासाठीचा समितीचा निर्णय अंतिम असेल.

(८) संरक्षणाचे स्वरूप व कालावधी हा, समितीने ठरविल्याप्रमाणे असेल.

अन्वेषणादरम्यान साक्षीदारांना संरक्षण देणे.

**८.** ज्या व्यक्तीने पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली असेल त्या व्यक्तीच्या किंवा ज्या खबरीने अपराधाची माहिती दिली असेल त्या खबरीच्या किंवा ज्या कृत्यामुळे अपराध घडला त्या कृत्याची जी व्यक्ती साक्षीदार असेल त्या व्यक्तीच्या जीवास धोका असल्याबाबत त्या गुन्ह्याचा तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, त्यास, संबंधित समितीच्या मान्यतेने अशा व्यक्तीला संरक्षण देता येईल आणि अन्वेषण पूर्ण होईपर्यंत ते संरक्षण पुढे चालू राहील.

COURT BOOK EMPOWERING LEGAL CLARITY

न्यायचौकशी-दरम्यान संरक्षण देणे.

**९.** न्यायचौकशीदरम्यान खटल्यातील एखाद्या साक्षीदाराने किंवा सरकारी अभियोक्त्याने किंवा अतिरिक्त सरकारी अभियोक्त्याने साक्षीदाराच्या संरक्षणासाठी अर्ज केला असेल तर, या खटल्यातील साक्षीदारांच्या जीवास धोका आहे अशी जर न्यायालयाची स्वतःची खात्री पटली असेल तर, न्यायालय साक्षीदारांना संरक्षण देण्याचा निदेश, जिल्हा समितीला देईल व तद्नुसार समितीस साक्षीदाराला संरक्षण देता येईल.

साक्षीदारांना संरक्षण देण्यासाठी विचारात घ्यावयाचे घटक.

**१०.** संबंधित समिती साक्षीदारांना संरक्षण देताना पुढील घटक विचारात घेईल,–

(क) खटल्याचे स्वरूप ;

(ख) खटल्यातील साक्षीदारांचे महत्त्व ;

(ग) साक्षीदारांना दिलेल्या धमकीच्या गांभीर्याची तिव्रता ;

(घ) साक्षीदारांचा पूर्व इतिहास ;

(ङ) विहित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही बाबी.

अन्वेषणादरम्यान साक्षीदाराचे नाव उघड न करणे.

**११.** गुन्ह्याच्या अन्वेषणाशी संबंधित गुन्हा अन्वेषण अधिकारी किंवा कोणताही पोलीस अधिकारी किंवा साक्षीदारांची नावे व पत्ते याबाबतीतील माहिती ज्या व्यक्तीस प्राप्त झाली असेल अशी कोणतीही व्यक्ती, ज्या साक्षीदारांना संरक्षण दिलेले आहे त्यांची अशी माहिती, खटला निकालात निघेपर्यंत उघड करणार नाही.

न्यायालयाने करावयाच्या आवश्यक त्या उपाययोजना.

**१२.** फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ व भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ यांच्या तरतुदींच्या अधीन राहून, साक्षीदाराच्या संरक्षणाच्या हितार्थ उपाययोजना करणे आवश्यक असल्याबाबत न्यायालयाची खात्री पटली असल्यास, न्यायालयास, पुढील उपाययोजना करता येतील,– (१९७४ चा २. १८७२ चा १.)

(क) न्यायालय ठरवील त्या ठिकाणी व वेळी त्या खटल्याची कार्यवाही करणे ;

(ख) संरक्षण दिलेल्या साक्षीदारांची थेट व्हिडिओ-दूरसंचरण माध्यमाद्वारे किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे, साक्ष नोंदविणे ;

(ग) स्वतःच्या आदेशांमध्ये व न्यायनिर्णयांमध्ये आणि खटल्यातील जनतेसाठी खुल्या असणाऱ्या इतर कोणत्याही अभिलेखांमध्ये साक्षीदारांची नावे व पत्ते नमूद करण्याचे टाळणे ;

(घ) ज्या खटल्याच्या कार्यवाहीत साक्षीदारांना संरक्षण देण्यात आलेले आहे किंवा संरक्षणास मुदतवाढ देण्यात आली आहे, न्यायालय, अशा न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या सर्व किंवा कोणत्याही कार्यवाहीस प्रसिद्धी देण्यात येऊ नये किंवा ती कोणत्याही रितीने प्रसारित करण्यात येऊ नये, असा आदेश देऊ शकेल.

अपराध.

**१३.** (१) साक्षीदारांना प्रत्यक्ष संरक्षण देण्यात येत आहे हे ज्ञात असलेला जो अन्वेषण अधिकारी किंवा कोणताही पोलीस अधिकारी किंवा कोणतीही व्यक्ती, कलम ११ च्या तरतुदींचे उल्लंघन करील त्यास, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, किंवा त्या दोन्ही शिक्षा होतील.

(२) जी व्यक्ती, कलम १२ अन्वये न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा निदेशाचे उल्लंघन करील अशा कोणत्याही व्यक्तीस तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, किंवा त्या दोन्ही शिक्षा होतील.

**१४.** कलम १३ खालील शिक्षापात्र अपराध हे दखलपात्र असतील आणि ज्याच्या स्थानिक अधिकारक्षेत्रात अपराध घडले असतील तेथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याच्या किंवा महानगर दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाकडून न्यायचौकशी करण्यायोग्य असतील. अपराधांची दखल घेणे.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

**१५.** या अधिनियमाच्या तरतुदी ह्या, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना पूरक असतील आणि त्या त्यांचे न्यूनीकरण करणाऱ्या नसतील. हा अधिनियम इतर कायद्यांस पूरक असणे व न्यूनीकारक नसणे.

**१६.** या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृतीबद्दल राज्य शासन किंवा शासनाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कारवाई करता येणार नाही. सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

**१७.** राज्य शासनास, वेळोवेळी, अधिनियमाची किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे, अधिनियमाखाली घटित केलेल्या समित्यांना निदेश देता येईल. निदेश देण्याचा अधिकार.

**१८.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा दोन किंवा अधिक लागोपाठच्या अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले किंवा तो नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांचे एकमत झाले व त्यांनी असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित केला तर, तो नियम, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा, यथास्थिति, अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

**१९.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या प्रयोजनांशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.